**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004**
Phone : EPABX –2609000 Special Cell –260 9148.
Website : www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६ ००४
फोन इपीबीएक्स. २६०९००० विशेष कक्ष २६०९१४८
Estd : 1962
NAAC 'A' Grade

जा.क्र.विशेष कक्ष/ 176

दिनांक : ७/८/२०२०

14 AUG 2020

प्रति,

१. मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

२. मा. सचिव,
सर्व संलग्नित शैक्षणिक संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

३. मा. अधिविभागप्रमुख,
सर्व पदव्युत्तर अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय : १. सन २०२० – २०२१ या शैक्षणिक वर्षामध्ये संलग्नित महाविद्यालये / शैक्षणिक संस्था तसेच विद्यापीठाच्या विविध पदव्युत्तर अधिविभागातील विद्यार्थी प्रवेशामधील आरक्षण

२. सन २०२० – २०२१ या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थी वसतिगृह (हॉस्टेल) प्रवेशाबाबत..

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयासंदर्भात राज्य शासनाने अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये/संस्था यांच्यामधील विद्यार्थी प्रवेशासाठी विहित केलेल्या सामाजिक आरक्षणाची टक्केवारी खालीलप्रमाणे आपणास योग्य त्या कार्यवाहीसाठी कळविण्यात येत आहे :

| अ. क्र. | मागास प्रवर्ग | | आरक्षणाची विहित टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती | SC | १३ % |
| २. | अनुसूचित जमाती | ST | ७ % |
| ३. | विमुक्त जाती (अ) | VJA | ३ % |
| ४. | भटक्या जमाती (ब) | NTB | २.५ % |
| ५. | भटक्या जमाती (क) | NTC | ३.५ % |
| ६. | भटक्या जमाती (ड) | NTD | २ % |
| ७. | इतर मागासवर्ग | OBC | १९ % |
| ८. | सामाजिक आणि शैक्षणिक मागास प्रवर्ग | SEBC | १२ % |
| ९. | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | EWS | १० % |
| १०. | खुला | Open | २८ % |
| | | एकूण | १०० % |

(टीप : १.संस्था/महाविद्यालयातील प्रवेशासाठीच्या जबाबदार अधिकाऱ्यांनी शासनाच्या विहित आरक्षण धोरणानुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेशामध्ये आरक्षण देण्याची कार्यवाही शेवटच्या प्रवेश दिनांकापर्यंत करावयाची आहे.
२. छोटया संवर्गातील आरक्षणविषयक दि.२१/८/२०१९ च्या शासन परिपत्रकास दि.२२/८/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्थगिती देण्यात आली आहे. तथापि दि.२७/२/२०२० रोजीच्या शासन परिपत्रकान्वये दि. ४/७/२०२० रोजीच्या आरक्षण टक्केवारीप्रमाणे उपरोक्त निर्धारण कळविण्यात आले आहे. काही संवर्गाच्या आरक्षणाबाबत मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये याचिका प्रलंबित आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे जर बदल झाल्यास उपरोक्त आरक्षण टक्केवारीतही बदल होऊ शकतो.)

**विद्यार्थी प्रवेशातील समांतर आरक्षणाबाबत :**

सामाजिक आरक्षणाबरोबरच खालीलप्रमाणे समांतर आरक्षण विद्यार्थी प्रवेशासाठी शासनाने निर्धारित केले आहे —

१. विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेमध्ये महिलांसाठी पदवी स्तरावर शासन निर्णय क्र. जीईसी — २००० (१२३/२००७)/टी.ई.१ दि. १७.०४.२००० नुसार ३० टक्के आरक्षण देय आहे.

**(सोबत पृष्ठ क्र. ६ ते ७)**

२. शासन निर्णय क्र. संकीर्ण—२०१८/प्र.क्र.२३१/तांशि—४ दि.२५.६.२०१८ नुसार अकृषी विद्यापीठे संलग्नित महाविद्यालयातील सर्व स्तरीय प्रवेशामध्ये दिव्यांग (अपंग) विद्यार्थ्यांसाठी साठी ५ टक्के आरक्षण देय आहे.

**(सोबत पृष्ठ क्र. ८ ते ९)**

३. शासन निर्णय क्र. २०११/प्र. क्र. २०१२/क्र. ३ दि. ०२.०४.२०१८ नुसार अनाथ विद्यार्थ्यांना विद्यार्थी प्रवेशामध्ये १ टक्का आरक्षण देय आहे.

**(सोबत पृष्ठ क्र. १० ते १२)**

४. माजी सैनिक व त्यांच्या पाल्यांना विद्यार्थी प्रवेशामध्ये १० टक्के आरक्षण देय आहे. यासंदर्भातील कार्यवाहीसाठी कृपया खालील शासन पत्रे, परिपत्रके, शासन निर्णय, अवलोकनी घेण्यात यावीत :

**(सोबत पृष्ठ क्र. १३ ते १८)**

अ) महाराष्ट्र शासनाचे क्र. औचिमु २०१२/प्र. क्र. १८७/विशि— ३ उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे दि. १६.०८.२०१२ रोजीचे शासन पत्र.

ब) महाराष्ट्र शासन, मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य यांचे क्र. युएनआय/२०१२/मा. सैनिक/अवि/विशि — ८ १८७११ दि. ०६.१२.२०१२ रोजीचे शासनपत्र.

क) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे क्र. माजीसै—२००६/(२४१/०६)/मशि—६ दि. १०.०९.२००७ रोजीचे शासन पत्र.

ड) महाराष्ट्र राज्य, शिक्षण व सेवा योजन विभागाचे क्र. टी.सी.एम.१२०४/१६७/८५/मा.शि. दि. १३.०६.१९८५ रोजीचे शासनपत्र.

इ) महाराष्ट्र राज्य, शिक्षण व सेवा योजन विभागाचे क्र. टी.सी.एम. १९८४/१८५/८४३/ मा. शि—४ दि. २८.०६.१९८४ रोजीचे पत्र.

फ) महाराष्ट्र राज्य, सैनिक कल्याण विभागाचे क्र. १८१६४/शै.स/सैकवि—१७ दि.२८.०२.२०१७ रोजीचे पत्र.

वरील सर्व शासन पत्रे, परिपत्रके, शासन निर्णय, इत्यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.unishivaji.ac.in) उपलब्ध आहेत.

—३—

**प्रवेश प्रक्रियेसंदर्भातील इतर सर्वसाधारण सूचना :**

१ संलग्नित महाविद्यालये/संस्था तसेच विद्यापीठातील विविध अधिविभागांनी गुणवत्ता यादी (Merit list) तयार करून खुल्या किंवा अराखीव संवर्गातील पर्याप्त जागांवर प्रथमतः विद्यार्थी/विद्यार्थीनींना त्यांच्या मागास प्रवर्गाचा विचार न करता गुणानुक्रमे खुल्या प्रवर्गातून प्रवेश द्यावा. **(सोबत पृष्ठ क्र. १९)**

२ वरीलबाबत मागासवर्गीय विद्यार्थी/विद्यार्थीनींना खुल्या प्रवर्गातील जागांवर त्यांच्या गुणानुक्रमे प्रवेश दिला जात असल्याने आरक्षणाची विहित मर्यादा अथवा टक्केवारी त्यामुळे ओलांडली असे होणार नाही, याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी.

३ सामाजिक आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थी/विद्यार्थीनी यांनी (अनु. जाती/अनु.जमाती व्यतिरिक्त) विहित मुदतीतील शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्याचे नॉन—क्रिमिलेअर प्रमाणपत्र प्रवेशासाठी सादर करणे आवश्यक आहे. तसेच आर्थिक दुर्बल घटकांसाठीच्या १० टक्के आरक्षणांतर्गत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीं यांनीही त्याबाबतचे शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र प्रवेशासाठी सादर करणे आवश्यक आहे. **(सोबत पृष्ठ क्र.२० ते २२)**

४ विद्यार्थी प्रवेशातील आरक्षणाची पदे ज्या मागास प्रवर्गासाठी राखीव आहेत त्याच मागास प्रवर्गातून सर्व नियमांचे काटेकोर पालन करुन भरणे आवश्यक आहे. संबंधित मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या उपलब्धते अभावी प्रवेश रिक्त रहात असतील तर अन्य मागास प्रवर्गातून रिक्त प्रवेश पूर्ण करण्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या दि. ११.७.१९९७ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार कार्यवाही करावी. **(सोबत पृष्ठ क्र.२३ ते २४)**

५ उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि.११.७.१९९७ रोजीच्या शासन निर्णयात विद्यार्थी प्रवेशातील आरक्षणाच्या जागा रिक्त राहिल्या तर त्याबाबत पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी (एम. फिल व पीएच. डी वगळून) करावयाची कार्यवाही, शासन निर्णयातील मुद्दा क्र. ३ व क्र. ४ येथे नमूद केली आहे. ती खालीलप्रमाणे :

मुद्दा क्र. (३). : गुणवत्ता यादीनुसार प्रवेश प्रक्रिया केल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागापैकी काही जागा रिक्त राहिल्या तर त्या जागेवर एकूण प्रवेश क्षमतेच्या जास्तीत जास्त २ टक्के पर्यंत प्रवेशासाठी विशेष मागास प्रवर्गीय उमेदवारांना प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात यावे.

मुद्दा क्र. (४). : रिक्त जागांवर विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना कमाल २ टक्के जागांवर प्रवेश दिल्यानंतर जर जागा रिक्त राहिल्या तर त्या जागा इतर सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांची गुणवत्तेनुसार सरमिसळ करुन भरण्यात याव्यात.

वरीलप्रमाणे कार्यवाहीसाठी संबंधितांनी दि.११.७.१९९७ रोजीचा मूळ शासन निर्णयही कृपया सविस्तर अवलोकनी घ्यावा. आणखी असे की, सदर शासन निर्णयातील तरतूदींच्या अनुषंगाने विद्यापीठाने राज्य शासनाकडून मार्गदर्शन मागविले आहे. ते प्राप्त होताच वा अन्य मार्गाने शासनाने वरील तरतूदींसंदर्भात काही अद्ययावत आदेश निर्गमित केल्यास त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

—४—

६ विद्यापीठातील पीजीबीयुटीआर विभागाद्वारे नियंत्रित होणाऱ्या एम.फिल/पी.एचडी प्रवेशासंदर्भात युजीसी वा अन्य शिखर संस्थानी विद्यार्थी प्रवेशाबाबत सूचना जारी केल्या असतील तर सदर प्रवेशासाठी त्या विचारात घेणेत याव्यात. संबंधितांनी यासंदर्भात पीजीबीयुटीआर विभागाच्या प्रवेश माहितीपुस्तिकेचे (Prospects) सुक्ष्म अवलोकन करावे. सदर एम.फिल/पी.एचडी अभ्यासक्रमांसाठीच्या प्रवेशातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी राखीव असलेल्या जागा विद्यार्थ्यांच्या उपलब्धतेऐवजी रिक्त राहिल्या तर त्या त्याच मागास प्रवर्गांतर्गत भरण्यासाठी पुनःश्च विशेष प्रवेश मोहिमेचे (Special drive) आयोजन संबंधित विभागाद्वारे करण्यात येईल. तसेच विशेष मोहिमेचे आयोजन करुनही मागास प्रवर्गातील प्रवेशाच्या जागा रिक्त राहिल्या तर त्या वर क्र. ५ येथे नमूद केलेल्या दि. ११.७.१९९७ रोजीच्या शासन निर्णयातील तदतूदीनुसार भरण्यात याव्यात.

एम.फिल/पी.एचडी विद्यार्थी प्रवेशातील रिक्त राहिलेल्या मागासवर्गीय जागांबाबत विशेष कक्ष (विद्यापीठ प्रशासन व पदव्युत्तर अधिविभाग) स्थायी समितीच्या उपसमितीने केलेल्या शिफारसी, त्यांस मा. कुलगुरु व स्थायी समितीने दिलेली मान्यता यांच्या अनुषंगाने वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

आणखी असे की, सदर शासन निर्णयातील तरतूदींच्या अनुषंगाने विद्यापीठाने राज्य शासनाकडून मार्गदर्शन मागविले आहे. ते प्राप्त होताच वा अन्य मार्गाने शासनाने वरील तरतूदींसंदर्भात काही अद्ययावत आदेश निर्गमित केल्यास त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक राहील.

७ दिव्यांग (अपंग), अनाथ, माजी सैनिक इ. समांतर आरक्षणांतर्गत प्रवेशासाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनी यांनी सदर आरक्षणाबाबत शासनाच्या संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

८ विद्यापीठातील विविध अधिविभागांनी विद्यार्थी प्रवेशातील दिव्यांग (अपंग), अनाथ, माजी सैनिक इ. समांतर आरक्षणांतर्गत प्रवेश देत असताना, विशेष कक्ष (विद्यापीठ प्रशासन व पदव्युत्तर अधिविभाग) स्थायी समितीच्या उपसमितीने दि. २९.६.२०१८ रोजीच्या बैठकीतील मुद्दा क्र.२ बाबत नमूद केलेल्या अ,ब आणि क या टप्प्यानुसार कार्यवाही करावी. दि. २९.६.२०१८ रोजीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत सोबत देण्यात येत आहे. **(सोबत पृष्ठ क्र.२५ ते २६)**

९ शासनाने विद्यार्थी प्रवेशासाठी लागू केलेल्या एसईबीसी (मराठा) आरक्षण आणि अर्थिक दुर्बल घटकांसाठीच्या आरक्षणाची कार्यवाही, यासंदर्भातील शासनाचे अधिनियम, अधिसूचना, शासन आदेश, परिपत्रके, शुध्दीपत्रके इ. द्वारे शासनाने निर्गमित केलेल्या सूचनांच्या काटेकोर अंमलबजावणीद्वारे करावी. **(सोबत पृष्ठ क्र.२७ ते २९)**

१० महाविद्यालय/संस्था यांच्या स्तरावर विद्यार्थी प्रवेशातील आरक्षणाच्या संबंधाने काही विशेष बाब निर्माण झाल्यास अथवा तक्रारी प्राप्त झाल्यास त्यांचे निराकरण संबंधित महाविद्यालयातील/संस्थेतील प्रवेश समितीने, दंडक १५८ नुसार संबंधित महाविद्यालयात/संस्थेत गठित केलेल्या स्थायी समितीच्या माध्यमातून करावयाचे आहे. विद्यापीठ स्तरावरील यासंदर्भातील कार्यवाही संबंधित अधिविभागातील प्रवेश समिती आणि विशेष कक्ष स्थायी समिती (विद्यापीठ प्रशासन व पदव्युत्तर अधिविभाग) अथवा स्थायी समिती गठित उपसमिती यांचेद्वारे करण्यात येईल.

-५-

११ स्कॉलरशीप अथवा फ्रिशीपसाठी अर्ज करणाऱ्या पात्र मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून, शासनाच्या सामाजिक न्याय व सांस्कृतीक कार्य, क्रीडा व विशेष सहाय विभागाच्या क्र. इबीसी. २००३/प्र.क्र./३०१/मावक-२ दि. १.११.२००३ रोजीच्या शासन निर्णयानुसार कोणतेही शैक्षणिक शुल्क घेता येणार नाही.

१२ शासनाने विद्यार्थी प्रवेशासाठी लागू केलेल्या सामाजिक आरक्षणापैकी ज्या मागास प्रवर्गांच्या आरक्षणासंदर्भातील बाबी न्यायप्रविष्ठ आहेत त्यासंदर्भातील पुढील कार्यवाही मा. न्यायालयाने न्यायनिर्णय, व सदरबाबत शासनाकडून ज्या त्या वेळी प्राप्त होणारे शासन निर्णय/परिपत्रके इ. नुसार करणे बंधनकारक आहे.

१३ विद्यार्थी प्रवेशामध्ये सामाजिक अथवा समांतर आरक्षण लागू करण्यासंदर्भात शासनाने शासन निर्णय/परिपत्रके/शासन पत्रे इ. द्वारे विहित केलेल्या सर्व शर्ती आणि अटी या आरक्षणांतर्गत प्रवेश घेण्यासाठी लागू आहेत.

१४ महाविद्यालय/शैक्षणिक संस्था तसेच विद्यापीठातील विविध अधिविभागातील विद्यार्थी प्रवेशातील आरक्षणाबाबत उपरोक्त प्रमाणे सर्वसाधारण सूचना करण्यात येत आहेत. तथापि, त्यामध्ये मा. न्यायालयाचे न्यायनिर्णय, शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणारे नियम, अधिनियम, अधिसूचना, शासन आदेश, परिपत्रके, शुध्दीपत्रके, विद्यापीठ नियम इ. द्वारे बदल करण्यात आल्यास त्या अनुषंगाने योग्य ती पुढील कार्यवाही करुन सन २०१९-२० मधील विद्यार्थी प्रवेश प्रक्रिया विहित पध्दतीचा अवलंब करुन नियमानुसार करण्यात यावी.

महाविद्यालय/शैक्षणिक संस्था तसेच विद्यापीठातील विविध अधिविभागांमध्ये सन २०१९-२० करिता देण्यात येणाऱ्या विद्यार्थी प्रवेशातील आरक्षणाची माहिती विद्यापीठाच्या सांख्यिकी विभागाद्वारे स्वतंत्र परिपत्रकान्वये मागविण्यात येईल. त्यानुसार संबंधित विभागाकडे विहित प्रपत्रातील माहिती महाविद्यालये/शैक्षणिक संस्था तसेच विद्यापीठातील विविध अधिविभागानी तात्काळ देणे अत्यावश्यक आहे याची नोंद घेण्यात यावी.

कळावे.

आपला विश्वासू,

कुलसचिव

सोबत : वरीलप्रमाणे

प्रत : माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
१. पदव्युत्तर प्रवेश विभाग
२. पीजी बीयुटीआर विभाग
३. सांख्यिकी विभाग

Brs\desktop\circular 01.06.2019.doc

शैक्षणिक वर्ष २०१९–२० करिता विद्यार्थी प्रवेशातील आरक्षण निश्चित करण्यासाठीची नियमावली :

अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांतील विद्यार्थी प्रवेशासाठी राज्य शासनाने एसईबीसी (मराठा) आरक्षण १६ टक्के, अर्थिक दुर्बल घटकांसाठीचे आरक्षण १० टक्के लागू केले आहे. सदरचे आरक्षण व तत्पूर्वीचे ५० टक्के आरक्षण यामुळे विद्यार्थी प्रवेशातील एकूण आरक्षण ७६ टक्के झाले आहे. त्यानुसार विद्यार्थी प्रवेशातील आरक्षणाची काटेकोर अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. ज्या ठिकाणी सर्व मागास प्रवर्गांना आरक्षण मिळू शकेल इतकी विद्यार्थी प्रवेश संख्या उपलब्ध आहे, त्या ठिकाणी आरक्षणाची अंमलबजावणी करता येते. तथापि, ज्या ठिकाणी प्रवेश क्षमता कमी आहे व सर्व मागास प्रवर्गांना टक्केवारीनुसार आरक्षण प्रदान करता येणार नाही त्याठिकाणी आरक्षणाचा प्राधान्यक्रम निर्धारित करणे आवश्यक आहे. तसेच विहित आरक्षण निर्धारणासाठी आवश्यक ते गणन करण्याच्या दृष्टीने धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. यासंदर्भात शासनाकडेही मार्गदर्शन मागविले आहे, परंतु विद्यापीठातील व महाविद्यालयातील विद्यार्थी प्रवेश प्रक्रिया तात्काळ आरंभ होत असल्याने शैक्षणिक वर्ष २०१९–२० करिता विद्यार्थी प्रवेशातील आरक्षण निश्चित करण्यासाठीची नियमावली बनविण्याची बाब विशेष कक्ष (विद्यापीठ प्रशासन व पदव्युत्तर अधिविभाग) स्थायी समितीची उपसमिती व महाविद्यालयांच्यासाठीच्या विशेष कक्ष (विद्यापीठ स्तर) स्थायी समितीच्या उपसमिती यांच्या संयुक्त बैठकीत विचारार्थ सादर.

१. विद्यार्थी प्रवेशातील एसईबीसी (मराठा) आरक्षण, अर्थिक दुर्बल घटकांसाठीचे आरक्षण निर्धारित करण्यासाठी, या आरक्षणांच्या सरळसेवा भरतीसाठी राज्य शासनाने निर्गमित केलेले शासन आदेश, शासन परिपत्रके इ. मधील तरतूदी विचारात घेणेत याव्यात.

२. ज्या विषयांसाठी/अभ्यासक्रमांसाठी उपलब्ध प्रवेश क्षमता अल्प आहे (उदा.२, ३, ४, ६ इत्यादि) त्यामधील आरक्षणाचा प्राधान्यक्रम ठरविण्यासाठी दि. ७.१.२०१९, दि. २९.५.२०१७ रोजीच्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन परिपत्रकातील सरळसेवा भरतीसंदर्भातील तदतूदीनुसार कार्यवाही करावी.

३. विजाभज (VJNT) प्रवर्गासाठीच्या एकत्रित ११ टक्के आरक्षणानुसार ज्या ठिकाणी १ पद उपलब्ध होते, त्या ठिकाणी उपरोल्लिखीत दि. ७.१.२०१९ रोजीच्या शासन परिपत्रकातील तरतूदीनुसार विजाअ प्रवर्गास (VJA) प्राधान्याने आरक्षण देण्यात यावे.

४. विद्यार्थी प्रवेशातील आरक्षण निश्चित करत असताना, ०.५ अथवा त्यापुढील अपूर्णांकाचे गणन '१' अशा पूर्णसंख्येत करावे. तसेच एखाद्या विषयाचे टक्केवारीनुसार आरक्षण निश्चित करताना ज्या मागास प्रवर्गासाठीचा अपूर्णांक मोठा असेल त्यास प्राधान्य देण्यात यावे. (उदा. ०.५४ आणि ०.५६ असेल तर ०.५६ ला प्राधान्य द्यावे.)

५. विद्यार्थी प्रवेशातील एसईबीसी (मराठा) आरक्षण, अर्थिक दुर्बल घटकांसाठीचे आरक्षण याबाबतची कार्यवाही संबंधित अधिविभाग आणि पदव्युत्तर प्रवेश विभाग यांचेद्वारे ज्या त्या वेळचे मा. न्यायालयाचे न्यायनिर्णय, राज्य शासनाचे आदेश इत्यादि अनुलक्षून करणे बंधनकारक आहे.

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004**
Phone : EPABX – 2609000 Special Cell – 260 9148.
Website : www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६ ००४
फोन इपीबीएक्स २६०९००० विशेष कक्ष २६०९१४८
Estd : 1962
NAAC 'A' Grade

जा.क्र.विशेष कक्ष/ 176 दिनांक : ७/८/२०२०

14 AUG 2020

प्रति,

१. मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

२. मा. सचिव,
सर्व संलग्नित शैक्षणिक संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

३. मा. अधिविभागप्रमुख,
सर्व पदव्युत्तर अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय : १. सन २०२० — २०२१ या शैक्षणिक वर्षामध्ये संलग्नित महाविद्यालये / शैक्षणिक संस्था तसेच विद्यापीठाच्या विविध पदव्युत्तर अधिविभागातील विद्यार्थी प्रवेशामधील आरक्षण

२. सन २०२० -- २०२१ या शैक्षणिक वर्षातील विद्यार्थी वसतिगृह (हॉस्टेल) प्रवेशाबाबत..

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयासंदर्भात राज्य शासनाने अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालये/संस्था यांच्यामधील विद्यार्थी प्रवेशासाठी विहित केलेल्या सामाजिक आरक्षणाची टक्केवारी खालीलप्रमाणे आपणास योग्य त्या कार्यवाहीसाठी कळविण्यात येत आहे :

| अ. क्र. | मागास प्रवर्ग | | आरक्षणाची विहित टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती | SC | १३ % |
| २. | अनुसूचित जमाती | ST | ७ % |
| ३. | विमुक्त जाती (अ) | VJA | ३ % |
| ४. | भटक्या जमाती (ब) | NTB | २.५ % |
| ५. | भटक्या जमाती (क) | NTC | ३.५ % |
| ६. | भटक्या जमाती (ड) | NTD | २ % |
| ७. | इतर मागासवर्ग | OBC | १९ % |
| ८. | सामाजिक आणि शैक्षणिक मागास प्रवर्ग | SEBC | १२ % |
| ९. | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक | EWS | १० % |
| १०. | खुला | Open | २८ % |
| | | एकूण | १०० % |

(टीप : १ संस्था / महाविद्यालयातील प्रवेशासाठीच्या जबाबदार अधिकाऱ्यांनी शासनाच्या विहित आरक्षण धोरणानुसार मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेशामध्ये आरक्षण देण्याची कार्यवाही शेवटच्या प्रवेश दिनांकापर्यंत करावयाची आहे.
२. छोट्या संवर्गातील आरक्षणविषयक दि.२१/८/२०१९ च्या शासन परिपत्रकास दि.२२/८/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्थगिती देण्यात आली आहे. तथापि दि.२७/२/२०२० रोजीच्या शासन परिपत्रकान्वये दि. ४/७/२०२० रोजीच्या आरक्षण टक्केवारीप्रमाणे उपरोक्त निर्धारण कळविण्यात आले आहे. काही संवर्गाच्या आरक्षणाबाबत मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये याचिका प्रलंबित आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे जर बदल झाल्यास उपरोक्त आरक्षण टक्केवारीतही बदल होऊ शकतो.)

**विद्यार्थी प्रवेशातील समांतर आरक्षणाबाबत :**

सामाजिक आरक्षणाबरोबरच खालीलप्रमाणे समांतर आरक्षण विद्यार्थी प्रवेशासाठी शासनाने निर्धारित केले आहे

१. विद्यार्थी प्रवेश प्रक्रियेमध्ये महिलांसाठी पदवी स्तरावर शासन निर्णय क्र. जीईसी — २००० (१२३/२००७)/टी.ई.१ दि. १७.०४.२००० नुसार ३० टक्के आरक्षण देय आहे. (सोबत पृष्ठ क्र. ६ ते ७)

२. शासन निर्णय क्र. संकीर्ण—२०१८/प्र.क्र.२३१/तांशि—४ दि.२५.६.२०१८ नुसार अकृषी विद्यापीठे संलग्नित महाविद्यालयातील सर्व स्तरीय प्रवेशामध्ये दिव्यांग (अपंग) विद्यार्थ्यांसाठी साठी ५ टक्के आरक्षण देय आहे. (सोबत पृष्ठ क्र. ८ ते ९)

३. शासन निर्णय क्र. २०११/प्र. क्र. २०१२/क्र. ३ दि. ०२.०४.२०१८ नुसार अनाथ विद्यार्थ्यांना विद्यार्थी प्रवेशामध्ये १ टक्का आरक्षण देय आहे. (सोबत पृष्ठ क्र. १० ते १२)

४. माजी सैनिक व त्यांच्या पाल्यांना विद्यार्थी प्रवेशामध्ये १० टक्के आरक्षण देय आहे. यासंदर्भातील कार्यवाहीसाठी कृपया खालील शासन पत्रे, परिपत्रके, शासन निर्णय, अवलोकनी घेण्यात यावीत : (सोबत पृष्ठ क्र. १३ ते १८)

अ) महाराष्ट्र शासनाने क्र. औनिमु २०१२/प्र. क्र. १८७/विशि— ३ उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे दि. १६.०८.२०१२ रोजीचे शासन पत्र.

ब) महाराष्ट्र शासन, मा. शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य यांचे क्र. युएनआय/२०१२/मा. सैनिक/अवि/विशि — ८ १८७११ दि. ०६.१२.२०१२ रोजीचे शासनपत्र.

क) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे क्र. माजीसै—२००६/(२४१/०६)/मशि—६ दि. १०.०९.२००७ रोजीचे शासन पत्र.

ड) महाराष्ट्र राज्य, शिक्षण व सेवा योजन विभागाचे क्र. टी.सी.एम.१२०४/१६७/८५/मा.शि. दि. १३.०६.१९८५ रोजीचे शासनपत्र.

इ) महाराष्ट्र राज्य, शिक्षण व सेवा योजन विभागाचे क्र. टी.सी.एम. १९८४/१८५/८४३/मा. शि—४ दि. २८.०६.१९८४ रोजीचे पत्र.

फ) महाराष्ट्र राज्य, सैनिक कल्याण विभागाचे क्र. १८१६४/शै.स/सैकवि—१७ दि.२८.०२.२०१७ रोजीचे पत्र.

वरील सर्व शासन पत्रे, परिपत्रके, शासन निर्णय, इत्यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (www.unishivaji.ac.in) उपलब्ध आहेत.

—३—

**प्रवेश प्रक्रियेसंदर्भातील इतर सर्वसाधारण सूचना :**

१ संलग्नित महाविद्यालये/संस्था तसेच विद्यापीठातील विविध अधिविभागांनी गुणवत्ता यादी (Merit list) तयार करून खुल्या किंवा अराखीव संवर्गातील पर्याप्त जागांवर प्रथमतः विद्यार्थी/विद्यार्थीनींना त्यांच्या मागास प्रवर्गांचा विचार न करता गुणानुक्रमे खुल्या प्रवर्गातून प्रवेश द्यावा. (सोबत पृष्ठ क्र. १९)

२ वरीलप्रमाणे मागासवर्गीय विद्यार्थी/विद्यार्थीनींना खुल्या प्रवर्गातील जागांवर त्यांच्या गुणानुक्रमे प्रवेश दिला जात असल्याने आरक्षणाची विहित मर्यादा अथवा टक्केवारी त्यामुळे ओलांडली असे होणार नाही, याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी.

३ सामाजिक आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थी/विद्यार्थीनी यांनी (अनु. जाती/अनु.जमाती व्यतिरिक्त) विहित मुदतीतील शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्याचे नॉन–क्रिमिलेअर प्रमाणपत्र प्रवेशासाठी सादर करणे आवश्यक आहे. तसेच आर्थिक दुर्बल घटकांसाठीच्या १० टक्के आरक्षणांतर्गत प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीं यांनीही त्याबाबतचे शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र प्रवेशासाठी सादर करणे आवश्यक आहे. (सोबत पृष्ठ क्र.२० ते २२)

४ विद्यार्थी प्रवेशातील आरक्षणाची पदे ज्या मागास प्रवर्गासाठी राखीव आहेत त्याच मागास प्रवर्गातून सर्व नियमांचे काटेकोर पालन करुन भरणे आवश्यक आहे. संबंधित मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या उपलब्धते अभावी प्रवेश रिक्त रहात असतील तर अन्य मागास प्रवर्गातून रिक्त प्रवेश पूर्ण करण्याबाबत महाराष्ट्र शासनाच्या दि. ११.७.१९९७ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार कार्यवाही करावी. (सोबत पृष्ठ क्र.२३ ते २४)

५ उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या दि.११.७.१९९७ रोजीच्या शासन निर्णयात विद्यार्थी प्रवेशातील आरक्षणाच्या जागा रिक्त राहिल्या तर त्याबाबत पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी (एम. फिल व पीएच. डी वगळून) करावयाची कार्यवाही, शासन निर्णयातील मुद्दा क्र. ३ व क्र. ४ येथे नमूद केली आहे. ती खालीलप्रमाणे :

मुद्दा क्र. (३). : गुणवत्ता यादीनुसार प्रवेश प्रक्रिया केल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागापैकी काही जागा रिक्त राहिल्या तर त्या जागेवर एकूण प्रवेश क्षमतेच्या जास्तीत जास्त २ टक्के पर्यंत प्रवेशासाठी विशेष मागास प्रवर्गीय उमेदवारांना प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात यावे.

मुद्दा क्र. (४). : रिक्त जागांवर विशेष मागास प्रवर्गातील उमेदवारांना कमाल २ टक्के जागांवर प्रवेश दिल्यानंतर जर जागा रिक्त राहिल्या तर त्या जागा इतर सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांची गुणवत्तेनुसार सरमिसळ करुन भरण्यात याव्यात.

वरीलप्रमाणे कार्यवाहीसाठी संबंधितानी दि.११.७.१९९७ रोजीचा मूळ शासन निर्णयही कृपया सविस्तर अवलोकनी घ्यावा. आणखी असे की, सदर शासन निर्णयातील तरतूदींच्या अनुषगाने विद्यापीठाने राज्य शासनाकडून मार्गदर्शन मागविले आहे. ते प्राप्त होताच वा अन्य मार्गाने शासनाने वरील तरतूदींसंदर्भात काही अद्ययावत आदेश निर्गमित केल्यास त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे.

६ विद्यापीठातील पीजीबीयुटीआर विभागाद्वारे नियंत्रित होणाऱ्या एम.फिल / पी.एचडी प्रवेशासंदर्भात युजीसी वा अन्य शिखर संस्थानी विद्यार्थी प्रवेशाबाबत सूचना जारी केल्या असतील तर सदर प्रवेशासाठी त्या विचारात घेणेत याव्यात. संबंधितांनी यासंदर्भात पीजीबीयुटीआर विभागाच्या प्रवेश माहितीपुस्तिकेचे (Prospects) सुक्ष्म अवलोकन करावे. सदर एम.फिल / पी.एचडी अभ्यासक्रमांसाठीच्या प्रवेशातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी राखीव असलेल्या जागा विद्यार्थ्यांच्या उपलब्धतेअभावी रिक्त राहिल्या तर त्या त्याच मागास प्रवर्गांतर्गत भरण्यासाठी पुनःश्च विशेष प्रवेश मोहिमेचे (Special drive) आयोजन संबंधित विभागाद्वारे करण्यात येईल. तसेच विशेष मोहिमेचे आयोजन करुनही मागास प्रवर्गातील प्रवेशाच्या जागा रिक्त राहिल्या तर त्या वर क्र. ५ येथे नमूद केलेल्या दि. ११.७.१९९७ रोजीच्या शासन निर्णयातील तदतुदीनुसार भरण्यात याव्यात.

एम.फिल / पी.एचडी विद्यार्थी प्रवेशातील रिक्त राहिलेल्या मागासवर्गीय जागांबाबत विशेष कक्ष (विद्यापीठ प्रशासन व पदव्युत्तर अधिविभाग) स्थायी समितीच्या उपसमितीने केलेल्या शिफारसी, त्यांस मा. कुलगुरु व स्थायी समितीने दिलेली मान्यता यांच्या अनुषंगाने वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

आणखी असे की, सदर शासन निर्णयातील तरतुदींच्या अनुषंगाने विद्यापीठाने राज्य शासनाकडून मार्गदर्शन मागविले आहे. ते प्राप्त होताच वा अन्य मार्गाने शासनाने वरील तरतुदींसंदर्भात काही अद्ययावत आदेश निर्गमित केल्यास त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक राहील.

७ दिव्यांग (अपंग), अनाथ, माजी सैनिक इ. समांतर आरक्षणांतर्गत प्रवेशासाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थीनी यांनी सदर आरक्षणाबाबत शासनाच्या संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

८ विद्यापीठातील विविध अधिविभागांनी विद्यार्थी प्रवेशातील दिव्यांग (अपंग), अनाथ, माजी सैनिक इ. समांतर आरक्षणांतर्गत प्रवेश देत असताना, विशेष कक्ष (विद्यापीठ प्रशासन व पदव्युत्तर अधिविभाग) स्थायी समितीच्या उपसमितीने दि. २९.६.२०१८ रोजीच्या बैठकीतील मुद्दा क्र.२ बाबत नमूद केलेल्या अ,ब आणि क या टप्प्यानुसार कार्यवाही करावी. दि. २९.६.२०१८ रोजीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत सोबत देण्यात येत आहे. (सोबत पृष्ठ क्र.२५ ते २६)

९. शासनाने विद्यार्थी प्रवेशासाठी लागू केलेल्या एसईबीसी (मराठा) आरक्षण आणि अर्थिक दुर्बल घटकांसाठीच्या आरक्षणाची कार्यवाही, यासंदर्भातील शासनाचे अधिनियम, अधिसूचना, शासन आदेश, परिपत्रके, शुध्दीपत्रके इ. द्वारे शासनाने निर्गमित केलेल्या सूचनांच्या काटेकोर अमलबजावणीद्वारे करावी. (सोबत पृष्ठ क्र.२७ ते २९)

१० महाविद्यालय / संस्था यांच्या स्तरावर विद्यार्थी प्रवेशातील आरक्षणाच्या संबंधाने काही विशेष बाब निर्माण झाल्यास अथवा तक्रारी प्राप्त झाल्यास त्यांचे निराकरण संबंधित महाविद्यालयातील / संस्थेतील प्रवेश समितीने, दंडक १५८ नुसार संबंधित महाविद्यालयात / संस्थेत गठित केलेल्या स्थायी समितीच्या माध्यमातून करावयाचे आहे. विद्यापीठ स्तरावरील यासंदर्भातील कार्यवाही संबंधित अधिविभागातील प्रवेश समिती आणि विशेष कक्ष स्थायी समिती (विद्यापीठ प्रशासन व पदव्युत्तर अधिविभाग) अथवा स्थायी समिती गठित उपसमिती यांचेद्वारे करण्यात येईल.

११ स्कॉलरशीप अथवा फ्रिशीपसाठी अर्ज करणाऱ्या पात्र मागासवर्गीय विद्यार्थ्यांकडून, शासनाच्या सामाजिक न्याय व सांस्कृतीक कार्य, क्रीडा व विशेष सहाय विभागाच्या क्र. इबीसी. २००३/प्र.क्र./३०१/मावक—२ दि. १.११.२००३ रोजीच्या शासन निर्णयानुसार कोणतेही शैक्षणिक शुल्क घेता येणार नाही.

१२ शासनाने विद्यार्थी प्रवेशासाठी लागू केलेल्या सामाजिक आरक्षणापैकी ज्या मागास प्रवर्गांच्या आरक्षणासंदर्भातील बाबी न्यायप्रविष्ठ आहेत त्यासंदर्भातील पुढील कार्यवाही मा. न्यायालयाचे न्यायनिर्णय, व सदरबाबत शासनाकडून ज्या त्या वेळी प्राप्त होणारे शासन निर्णय/परिपत्रके इ. नुसार करणे बंधनकारक आहे.

१३ विद्यार्थी प्रवेशामध्ये सामाजिक अथवा समांतर आरक्षण लागू करण्यासंदर्भात शासनाने शासन निर्णय/परिपत्रके/शासन पत्रे इ. द्वारे विहित केलेल्या सर्व शर्ती आणि अटी या आरक्षणांतर्गत प्रवेश घेण्यासाठी लागू आहेत.

१४ महाविद्यालय/शैक्षणिक संस्था तसेच विद्यापीठातील विविध अधिविभागातील विद्यार्थी प्रवेशातील आरक्षणाबाबत उपरोक्त प्रमाणे सर्वसाधारण सूचना करण्यात येत आहेत. तथापि, त्यामध्ये मा. न्यायालयाचे न्यायनिर्णय, शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणारे नियम, अधिनियम, अधिसूचना, शासन आदेश, परिपत्रके, शुध्दीपत्रके, विद्यापीठ नियम इ. द्वारे बदल करण्यात आल्यास त्या अनुषंगाने योग्य ती पुढील कार्यवाही करुन सन २०१९—२० मधील विद्यार्थी प्रवेश प्रक्रिया विहित पध्दतीचा अवलंब करुन नियमानुसार करण्यात यावी.

महाविद्यालय/शैक्षणिक संस्था तसेच विद्यापीठातील विविध अधिविभागांमध्ये सन २०१९—२० करिता देण्यात येणाऱ्या विद्यार्थी प्रवेशातील आरक्षणाची माहिती विद्यापीठाच्या सांख्यिकी विभागाद्वारे स्वतंत्र परिपत्रकान्वये मागविण्यात येईल. त्यानुसार संबंधित विभागाकडे विहित प्रपत्रातील माहिती महाविद्यालये/शैक्षणिक संस्था तसेच विद्यापीठातील विविध अधिविभागानी तात्काळ देणे अत्यावश्यक आहे याची नोंद घेण्यात यावी.

कळावे.

आपला विश्वासू,

कुलसचिव

सोबत : वरीलप्रमाणे

प्रत : माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
१. पदव्युत्तर प्रवेश विभाग
२. पीजी बीयुटीआर विभाग
३. सांख्यिकी विभाग

महाराष्ट्र राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाकरिता मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गास तसेच खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी जागा आरक्षित ठेवण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र. २२/विशि-३**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ८ मार्च, २०१९.

संदर्भ :-
१) विधी व न्याय विभागाचा सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६२, दि. ३० नोव्हेंबर, २०१८.
२) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि. १२ फेब्रुवारी, २०१९.
प्रस्तावना:-

महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) नागरिकांच्या वर्गाच्या प्रगतीसाठी राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरिता जागांच्या आरक्षणासाठी आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांच्या आणि पदांच्या आरक्षणासाठी आणि तत्संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींची तरतुद करण्यासाठीचा अधिनियम उपरोक्त संदर्भ क्रमांक १ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या दि. ३० नोव्हेंबर, २०१८ च्या राजपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर अधिनियमातील मुद्दा क्र. ४ (१) (क), अन्वये राज्यातील अनुदानित तसेच विनाअनुदानित शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाच्या एकूण १६% जागा मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) नागरिकांच्या प्रवर्गासाठी आरक्षित करण्यात आल्या आहेत.

तसेच संदर्भ क्रमांक २ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी शासकीय सेवा व शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाकरिता १०% जागा आरक्षित करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र. ४ अन्वये शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाबाबतचे आवश्यक आदेश सर्व संबंधीत विभागांनी तात्काळ निर्गमित करण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे.

सामान्य प्रशासन विभागाने उपरोक्त शासन निर्णयान्वये आदेशीत केल्यानुसार मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गास १६% जागा तसेच खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी १०% जागा महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाकरिता आरक्षित करण्याबाबत या विभागाच्या अधिनस्त असलेल्या सर्व सार्वजनिक अकृषी विद्यापीठांना निर्देश देण्याकरिता याबाबतचे शासन परिपत्रक निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक:-**

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ व २ ला अनुसरुन महाराष्ट्र राज्यातील सर्व सार्वजनिक अकृषी विद्यापीठातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाकरिता मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गास १६% जागा तसेच खुल्या प्रवर्गातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी १०% जागा आरक्षित ठेवण्यात याव्यात.

२. शासनाने निर्धारित केलेले शैक्षणिक संस्थातील प्रवेशामधील सदर आरक्षण राज्यातील उच्च व तंत्र शिक्षण विभागातंर्गत येणाऱ्या अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थाखेरीज सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, विधी विद्यापीठे, स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे, त्यांच्याशी संलग्नीत असणारी सर्व अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालये व स्वायत्त महाविद्यालये यांना लागू होईल. सदर आदेशाची प्रभावी अंमलबजावणी होईल हे पाहण्याची जबाबदारी संबंधित विद्यापीठांची राहील.

३. शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशासाठी विद्यापीठांनी/संस्थांनी नियम / परिनियम तयार केले असतील आणि त्यामध्ये विविध सामाजिक घटकांचे आरक्षण दर्शविण्यात आले असेल तर या आरक्षणाच्या अनुषंगाने त्या नियमात/ परिनियमात संबंधितांनी विहित कार्यपध्दतीनुसार आवश्यक त्या सुधारणा तातडीने कराव्यात.

४. सर्व विद्यापीठांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदरचे परिपत्रक त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व शैक्षणिक संस्थांच्या निदर्शनास आणून द्यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०३०८१४४०३०९२०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SIDDHARTH
KHARAT

(सिध्दार्थ खरात)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे विशेष कार्यअधिकारी, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. सचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
६. सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलगुरु / कुलसचिव.
७. सर्व विधि विद्यापीठांचे कुलगुरू/ कुलसचिव.

८. सर्व स्वंय अर्थसहाय्यीत / अभिमत विद्यापीठांचे कुलगुरू/ कुलसचिव
९. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य.
१२. सर्व विभागीय सहसंचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
१३.उप सचिव, (विशि) (मशि) (तांशि) उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
१४. उप सचिव (१६अ), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
१५.निवड नस्ती - कार्यासन विशि-३.

तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील उच्च शिक्षणाच्या शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थांमध्ये प्रवेशासाठी केंद्र शासनाच्या The Rights of Persons with Disabilities Act, २०१६ च्या तरतूदीनुसार कार्यवाही करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२३१/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २५ जून, २०१८

संदर्भ : १) The Rights of Persons with Disabilities Act, २०१६.
२) आयुक्त, अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.अकआ/प्र-७/मोफतशिक्षण/क-३१(२)/२०१७-१८/२८, दिनांक २०/६/२०१७.
३) संचालक तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र. २-अ/एडीएम/२०१८/४७४, दिनांक १०/४/२०१८.

प्रस्तावना :-

केंद्र शासनाने The rights of persons with Disabilities Act, २०१६, दिनांक २८ डिसेंबर,२०१६ रोजी राजपत्रात प्रसिध्द केला आहे. या अधिनियमाच्या कलम ३२ मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद आहे :-

१) All Government institutions of higher education and other higher education institutions receiving aid from the Government shall reserve not less than five per cent seats for persons with benchmark disabilities.
२) The person with benchmark disabilities shall be given an upper age relaxation of five years for admission in institutions of higher education.

केंद्र शासनाच्या या अधिनियमातील तरतूदीनुसार तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील पदवी व पदव्युत्तर शिक्षण देणाऱ्या विविध शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थांमध्ये लक्षणीय अपंगत्व असणाऱ्या व्यक्ती/ विद्यार्थ्याकरीता ५ टक्के इतक्या जागा राखीव ठेवणे आवश्यक आहे.

शासन निर्णय :-

The Rights of Persons with Disabilities Act, २०१६ च्या कलम ३२ (१) मधील तरतूदीनुसार तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील पदवी व पदव्युत्तर शिक्षण देणाऱ्या विविध शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थांमध्ये लक्षणीय अपंगत्व

असणाऱ्या व्यक्ती/ विद्यार्थ्यांकरीता ५ टक्के इतक्या जागा राखीव ठेवण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून करण्यात यावी. यासाठी विविध अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमामध्ये आवश्यक ती सुधारणा करण्यात यावी.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०६२५१८०५५६०४०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sanjay A. Dharurkar

Digitally signed by Sanjay A. Dharurkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=6371458f391d4f5c713e94ebda7bc6bee2301144467fcb4d1386300ee76ae7a2, cn=Sanjay A. Dharurkar
Date: 2018.06.26 15:46:54 +05'30'

(संजय औ.धारुरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा तथा सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, ८ वा मजला, न्यु एक्सलसिअर इमारत, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१
२. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. आयुक्त, अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय.
५. कुलसचिव, सर्व अकृषी सार्वजनिक विद्यापीठे.
६. सर्व संबंधित संस्था (तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत).
७. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. निवड नस्ती/तांशि-४.

अनाथ मुलांना खुल्या प्रवर्गातून १%
टक्का समांतर आरक्षण देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महिला व बाल विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः अगुजा-२०११/ प्र.क्र. २१२/ का-३,
नविन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक - ०२ एप्रिल, २०१८.

वाचा- शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्र.संकीर्ण-२०१३/प्र.क्र.१०९/का-३,
दिनांक ०६.०६.२०१६.

प्रस्तावना :-

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ अन्वये काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या अनाथ, निराधार बालकांना पोलीस, स्वयंसेवी संस्था, पालक यांचेकडून बाल कल्याण समितीमार्फत बालगृहात प्रवेश दिला जातो. ० ते १८ वयोगटातील अशा मुलांना बालगृहामध्ये अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य सुविधा, शिक्षण, प्रशिक्षण इत्यादी सुविधा पुरविल्या जातात व पुनर्वसनासाठी प्रयत्न केले जातात. अनाथ मुलांना त्यांचा संस्थेतील कालावधी संपल्यानंतर संस्थेच्या बाहेर पडल्यानंतर अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. अनाथ मुलांची जात नक्की माहिती नसल्याने, त्यांना कोणत्या एका विशिष्ट प्रवर्गात समाविष्ट करता येत नाही. जातीचा दाखला नसल्यामुळे, त्यांना विविध शासकीय लाभापासून वंचित रहावे लागते. त्यामुळे त्यांच्या भावी आयुष्यात अनेक अडचणी निर्माण होतात. अनाथ मुलांकडे कोणतीही कागदपत्रे व पुरावे नसल्यामुळे, त्यांना जातीचे प्रमाणपत्र मिळत नाही व त्यामुळे त्यांना विविध शासकीय सवलतीपासून वंचित रहावे लागते. त्यामुळे अनाथ मुलांना राज्य शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेता यावा, याकरीता आरक्षण लागू करणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार दिनांक १७ जानेवारी, २०१८ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत अनाथ मुलांना शिक्षण व नोकरी यामध्ये १% समांतर आरक्षण लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

शासन निर्णयः-

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ अन्वये काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या अनाथ, निराधार बालकांना संस्थेतून बाहेर पडल्यानंतर जातीचा दाखला नसल्यामुळे विविध शासकीय लाभांपासून वंचित रहावे लागते त्यामुळे अनाथ मुलांना राज्य शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेता यावा याकरीता शिक्षण व नोकरी यामध्ये खुल्या प्रवर्गातून १% समांतर आरक्षण लागू करण्यात येत आहे. त्यासाठी खालील अटी व शर्ती निश्चित करण्यात येत आहेत-

१) बालगृहातील व इतर अनाथ मुलांपैकी महिला व बाल विकास विभागाकडून देण्यात येणारे अनाथ प्रमाणपत्र असणा-या मुलांसाठीच हे आरक्षण लागू राहील. ज्या मुलांच्या कागदपत्रावर कोणत्याही जातीचा उल्लेख नाही व ज्याचे आईवडील, काका-काकू, आजी-आजोबा व चुलत भावंडे व इतर नातेवाईक यापैकी कोणाबाबतही माहिती उपलब्ध नाही, अशा मुलांनाच अनाथ आरक्षण लागू राहील.

२) तसेच ज्या मुलांचे आई वडिल हयात नसून त्यांचेकडे जातीचे प्रमाणपत्र नाही, अशा मुलांच्या बाबतीत त्यांनी संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडे अर्ज करणे आवश्यक राहील. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडून संबंधित जिल्ह्याच्या बाल कल्याण समितीकडे सदर अर्ज पाठविण्यात येईल. बाल कल्याण समितीकडून सदर अर्जाची तपासणी करण्यात येईल व आवश्यकतेनुसार पोलीस / महसूल विभागाच्या यंत्रणेकडून छाननी करुन तसेच मुलाखत घेऊन अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ४० दिवसात आपली शिफारस संबंधित विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास यांचेकडे निर्णयार्थ पाठविण्यात येईल. बाल कल्याण समितीची शिफारस विचारात घेऊन विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास यांचेकडून अनाथ प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात यावी. तसेच शिफारस अमान्य करण्यात येऊन अनाथ प्रमाणपत्र नाकारण्यात आल्यास विभागीय उपायुक्त महिला व बाल विकास यांचेकडून कारणासहित सदर अर्ज बाल कल्याण समितीकडे परत पाठविण्यात येईल. प्रमाणपत्राच्या अनुषंगाने जर कांही तक्रार असल्यास यासंदर्भात अपिलीय प्राधिकारी हे आयुक्त, महिला व बाल विकास हे राहतील.

३) उपरोक्त वाचा मधील दिनांक ०६.०६.२०१६ च्या शासन निर्णयानुसार महिला व बाल विकास विभागामार्फत बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमांतर्गत मान्यता प्राप्त (अनुदानित/विनाअनुदानित) संस्थामध्ये दाखल मुलांना अनाथ प्रमाणपत्र देणेबाबतची कार्यवाही विहीत करण्यात आली आहे. त्यानुसार अनाथ प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात यावी.

४) सदर निर्णय, शासन निर्णय लागू झाल्याच्या दिनांकापासून पुढे होणा-या सरळसेवा भरतीसाठी लागू राहील.

५) शासन सेवेत प्रवेशासाठी अनाथ मुलांसाठी खुल्या प्रवर्गातून १% समांतर आरक्षण गट " अ" ते "ड"च्या सर्व पदावर लागू राहील.

६) सदर आरक्षणाची गणना पद भरती करण्यात येणा-या रिक्त पदावर करण्यात यावी.

७) संबंधित भरती वर्षात अनाथ उमेदवार उपलब्ध न झाल्यास आरक्षणाचा अनुशेष पुढे न ओढता खुल्या प्रवर्गातून गुणवत्तेनुसार इतर उमेदवारांची नियुक्ती करण्यात यावी.

८) त्याचप्रमाणे शिक्षणांतर्गत शिष्यवृत्ती, वसतिगृह व व्यावसायिक शिक्षणांतर्गत शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेमध्ये सदर आरक्षण लागू राहील.

९) अनाथ आरक्षण प्रमाणपत्राच्या अनुषंगाने एखाद्या मुलाची नोकरीमध्ये नियुक्ती झाल्यास त्याने सादर केलेल्या अनाथ प्रमाणपत्राची फेरतपासणी आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांच्या मार्फत करणे आवश्यक राहील.

१०) अनाथ आरक्षणाबाबत करावयाच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने सविस्तर मार्गदर्शक सूचना स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

११) अनाथ आरक्षणाच्या लाभाच्या अनुषंगाने काही समस्या उद्भवल्यास त्याबाबत अभिनिर्णय घेण्याचा अधिकार शासनास राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४०२१३०९१३८०३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sandhya Sudhir Gawas

Digitally signed by Sandhya Sudhir Gawas [illegible]

( सं.सु.गवस )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव
२. सर्व मंत्रालयीन विभाग।
३. संचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई.
४. सचिव, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, वरळी, मुंबई.
५. आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे.
६. सर्व उप सचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व विभागीय महिला व बाल विकास अधिकारी,
८. सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी.
९. निवड नस्ती / का-३

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

विशेष कक्ष विद्यापीठ प्रशासन व पदव्युत्तर अधिविभाग स्थायी समितीच्या उपसमिती बैठकीचा कार्यवृत्तांत

मा. अधिविभागप्रमुख, संख्याशास्त्र अधिविभाग यांच्या दि. २९/६/२०१८ रोजीच्या पत्रास अनुसरून व सर्व अधिविभागांच्या शैक्षणिक वर्ष २०१८–१९ मधील विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता यादीमधील समांतर आरक्षण विषयक कार्यवाही करणेसाठी विशेष कक्ष विद्यापीठ स्थायी समितीच्या उपसमितीची बैठक शुक्रवार दिनांक २९ जून २०१८ रोजी विद्यापीठ कार्यालयामध्ये दुपारी ४.३० वाजता आयोजित केली होती.

सदर बैठकीसाठी उपस्थितीतीचा अहवाल खालीलप्रमाणे –

| | | |
|---|---|---|
| १) डॉ. एस. डी. शिंदे, भुगोल अधिविभाग | — | अध्यक्ष |
| २) डॉ. ए. एम. सरवदे, इंग्रजी अधिविभाग | — | सदस्य |
| ३) श्रीमती एन. डी. पाटील | — | सदस्या |
| ४) श्री. ए. एस. नलवडे, उपकुलसचिव | — | सदस्य सचिव |

— कामकाज —

बैठकीच्या सुरूवातीस उपकुलसचिव, विशेष कक्ष (सदस्य सचिव श्री. ए. एस. नलवडे) यांनी सर्व उपस्थित समिती सदस्यांचे स्वागत केले.

संख्याशास्त्र अधिविभागाने दि. २९/६/२०१८ रोजी सादर केलेले माजी सैनिक आरक्षणासंदर्भातील पत्र तसेच माजी सैनिक आरक्षणासाठीची शासनाची दि.१३.८.२०१४ , दि. १३.६.१९८५ रोजीचे परिपत्रके इ. अनुलक्षून खालीलप्रमाणे ठराव केले :–

१. संख्याशास्त्र अधिविभाग व पी.व्ही.डी.पी. महाविद्यालय, तासगाव येथील अपंग आरक्षणासंदर्भात विभागप्रमुख यांनी दि.२८.६.२०१८ रोजी विचारणा केली होती. त्यास अनुसरून विशेष कक्ष विभागाने आदेशान्वये संबंधित अधिविभागास अपंग प्रवर्गातील उपलब्ध विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता यादी तयार करावी व त्यातील गुणवत्ता अग्रक्रमानुसार एका विद्यार्थ्यास त्याच्या प्रवर्गांतर्गत (खुला किंवा सामाजिक प्रवर्ग) प्रवेश देता येईल असे कळविलेले आहे. विभागाने केलेली ही कार्यवाही विद्यार्थी प्रवेशासाठीच्या समांतर आरक्षणविषयक प्रचलित शासन धोरणानुसार आहे.

......२

२ संख्याशास्त्र अधिविभागप्रमुख यांनी दि. २९.६.२०१८ रोजी दिलेल्या पत्राच्या अनुषंगाने विद्यार्थी प्रवेशातील माजी सैनिक या समांतर आरक्षणांतर्गत दि. १३.८.२०१४ येथे उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय यांच्या परिपत्राकात दिलेल्या निर्देशानुसार अधिविभागानी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी असे ठरले.

अ) **प्रथम टप्पा** : खुल्या प्रवर्गातून समांतर आरक्षणाची पदे भरताना गुणवत्तेच्या निकषानुसार खुल्या प्रवर्गातील उमेदवारांची निवड यादी करावी. (या ठिकाणी खुल्या प्रवर्गात गुणवत्तेच्या आधारावर मागासवर्गीय उमेदवारांचाही समावेश होईल) या यादीत समांतर आरक्षणानुसार आवश्यक खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांची संख्या पर्याप्त असेल तर कोणताही प्रश्न उद्भवणार नाही. आणि त्यानुसार पदे भरावीत. जर या यादीत समांतर आरक्षणानुसार आवश्यक खुल्या प्रवर्गाच्या उमेदवारांची संख्या पर्याप्त नसेल तर खुल्या प्रवर्गासाठी राखीव समांतर आरक्षणाची पदे भरण्याकरिता सदर यादीतील आवश्यक पर्याप्त संख्येइतके शेवटचे उमेदवार वगळून पात्र उमेदवारापैकी केवळ खुल्या प्रवर्गाचेच आवश्यक पर्याप्त संख्येइतके उमेदवार घेणे आवश्यक आहे.

ब) दुसरा टप्पा : त्या नंतर प्रत्येक सामाजिक आरक्षणाच्या प्रवर्गातील उमेदवारांच्या निवड यादया तयार कराव्यात. (जे उमेदवार यापूर्वीच टप्पा अ मध्ये सामिल झाले असतील त्यांना या यादीतून वगळावे. )

क) तिसरा टप्पा : वरील ब नुसार तयार करण्यात आलेल्या यादयांमध्ये सामाजिक आरक्षणातील प्रत्येक प्रवर्गाच्या विहित टक्केवारीनुसार अ येथे विषद केलेल्या कार्यपध्दतीनुसार समांतर आरक्षणाचे पुरेसे उमेदवार समाविष्ट करावेत. मात्र असे करताना सामाजिक प्रवर्गांतर्गत रहावे.

आभार प्रदर्शनानंतर बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

29/6/18
श्री. ए. एस. नलवडे
सदस्य सचिव

29/6/18
डॉ. एस. डी. शिंदे
अध्यक्ष

28-2-2017
(९८)

दूरध्वनी 020-66202629
ई-मेल : resettle.dsw@mahasainik.com

सैनिक कल्याण विभाग,
महाराष्ट्र राज्य, राष्ट्रीय युद्ध
स्मारक, पुणे
पुणे - 411 001

क्रमांक : 18163/आरक्षण/शैक्षणिक/१२

दिनांक : फेब्रुवारी २०१७

- 1 MAR 2017

मा. कुलगुरु
शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर
(महाराष्ट्र राज्य सर्व विद्यापीठ)

विषय : शैक्षणिक अभ्यासक्रमांसाठी आजी-माजी सैनिकांच्या पाल्यांसाठी जागा राखीव ठेवण्याबाबत.

संदर्भ : १. महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र. मासैपा-२००५/(२४१/०६)/मांश-६ दिनांक १० सप्टेंबर २००६.
२. पुणे विद्यापीठ पत्र क्रमांक आरक्षण/ओ-५१/२०१४ दिनांक २६ जून २०१४
३. महाराष्ट्र शासन क्र. सैनिक-२०१४/प्र.क्र.२३५/सैनिक-२ दिनांक २१ जून २०१४

१. उपरोक्त विषयी संदर्भीय शासन परिपत्रक व शासन निर्णयांना अनुसरून विविध शैक्षणिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी राज्यातील आजी-माजी सैनिकांच्या पाल्यांना जागा आरक्षित ठेवण्यात आल्या आहेत.

२. त्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येत की, आपल्या विद्यापीठाच्या अधिनस्थ असणाऱ्या सर्व महाविद्यालयांमध्ये ( अभियांत्रिकी महाविद्यालये, टेक्निकल, टेक्नॉलॉजी, पॉलिटेक्निक, कला, वाणिज्य व अध्यापक महाविद्यालये) सर्व अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेमध्ये आजी-माजी सैनिकांच्या पाल्यांना आरक्षणाचा लाभ देण्यात यावा.

४. तसेच संदर्भीय शासन निर्णयातील तरतुदीनुसार शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ पासून चालू होणाऱ्या शैक्षणिक वर्षापासून माजी सैनिकांच्या पाल्यांना राखीव ठेवण्यात आलेल्या जागेवर प्रवेश देते वेळी माजी सैनिकांच्या पाल्यांकडे संबंधीत **जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाकडून देण्यात आलेले "माजी सैनिक पाल्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र "** असल्याशिवाय प्रवेश देण्यात येऊ नये. तसेच सादर केलेल्या प्रमाणपत्राबाबत काही शंका उपस्थित झाल्यास प्रमाणपत्राच्या सत्यतेबाबतची खात्री त्या संबंधीत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाकडून करुन घेण्यात यावी.

५. उपरोक्त विषयी आपल्या स्तरावरुन आदेश निर्गमीत करणे बाबत आपणास विनंती करण्यात येत आहे. (अधिक माहितीसाठी पुणे विद्यापीठाने केलेल्या पत्रव्यवहाराचे पत्र सोबत जोडले आहे.)

सुहास द. शिंदे
कर्नल (निवृत्त)
उपसंचालक (प्रशासन)
संचालक करिता

सोबत : वरील प्रमाणे

L:\DSW-२०\DSW-१६ - New\Current files\१८१६४ (Edu Corrs).doc